दि. ०२/०१/२३

(१) म.टा. पान नं. ०२

# रश्मी ठाकरे यांच्याविरोधात तक्रार

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पत्नी रश्मी ठाकरे यांच्या कथित मालकीच्या रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथील १९ बंगल्यांचे प्रकरण पुन्हा चर्चेत आले आहे. भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशी रविवारी रेवदंडा पोलिस ठाण्यात रश्मी ठाकरे यांच्याविरोधात तक्रार नोंदवली. पोलिसांनी या प्रकरणी रश्मी यांच्याविरोधात गुन्हा नोंद केल्यास ठाकरे कुटुंबीयांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.

पोलिसांत तक्रार नोंदविल्यानंतर सोमय्या यांनी पत्रकारांशी संवाद साधला. 'येत्या काही दिवसांमध्ये रेवदंडा पोलिस ठाण्याकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अहवाल दिला जाईल. त्यानंतर सात दिवसांत रश्मी ठाकरे यांच्याविरोधात गुन्हा दाखल होईल, असे आश्वासन मला देण्यात आले आहे,' असे किरीट सोमय्या यांनी सांगितले. 'उद्धव ठाकरे हे तत्कालीन मुख्यमंत्री असताना त्यांनीच रश्मी ठाकरे यांच्या मालकीचे १९ बंगले रेकॉर्डवरून गायब केले. मुख्यमंत्री कार्यालयाने यासाठी संबंधित यंत्रणेवर दडपण आणले,' असे आरोपही सोमय्या यांनी केले. 'या प्रकरणी रश्मी ठाकरे आणि अन्वय नाईक यांच्यात जमिनीचे व्यवहार झाले आहेत. रश्मी ठाकरे यांच्या नावावर कोकणात कथित १९ बंगले होते. एका अधिकाऱ्यास ठाकरे यांनी १३ वर्षांमधील बंगल्यांचा तपशील नष्ट करण्याचे आदेश दिले. त्यांनी १३ वर्षे या बंगल्यांची घरपट्टी भरली होती. परंतु, ठाकरे सरकारच्या काळात हे प्रकरण दडपण्यात आले,' असा दावाही त्यांनी रेवदंडा येथे केला.

(२) म.टा. मु. पान नं. ०१.



# अतिउत्साही १७० मद्यपींवर कारवाई

म. टा. वृत्तसेवा, वसई

**मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलिसांची कारवाई**

नववर्षाचे स्वागत करण्यासाठी पोलिसांनी शहरात चोख बंदोबस्त ठेवल्याने कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही. मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या पोलिसांसह वसई वाहतूक पोलिसांनी शहरात जागोजागी नाकाबंदी करून असंख्य वाहनचालकांची तपासणी केली. यामध्ये मद्यप्राशन करून वाहने चालविणाऱ्या १७० मद्यपींवर कारवाई करण्यात आली.

वसई-विरार शहरासह मिरा-भाईंदरमध्ये नववर्षाचे स्वागत करण्यासाठी शनिवारी रात्री विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. नागरिक मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर उतरले होते. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये तसेच, वाहतूककोंडी होऊ नये, यासाठी स्थानिक आणि वाहतूक पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता आणि जागोजागी नाकाबंदी केली होती. रात्री आठपासून लावण्यात आलेली नाकाबंदी पहाटे पाच वाजेपर्यंत होती. नाकाबंदीच्या वेळी पोलिसांनी अनेक वाहने आणि वाहनचालकांची तपासणी केली. यामध्ये पोलिसांचे फिरते पथक, बीट मार्शल यांची गस्त सुरू होती. शहरातील ठिकठिकाणच्या संवेदनशील ठिकाणांसह समुद्र व खाडी किनारे, मैदाने, निर्जनस्थळी पोलिसांकडून सतत गस्त घालण्यात येत होती. यामध्ये पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत एकूण १७० मद्यपी वाहनचालकांवर कारवाई केली आहे.

यामध्ये सर्वाधिक कारवाया या वसई विभागात करण्यात आल्या आहेत. एकूण ७१ कारवाया या ठिकाणी झाल्या असून त्याखालोखाल झोन एक काशिमिरा विभागात ५६ मद्यपी सापडले. तर, झोन ३ मध्ये ४३ अशा एकूण १७० कारवाया झाल्याची माहिती पोलिस आयुक्तालयातून मिळाली. ज्यांनी मद्यपान करून वाहने चालविली आहेत, त्यांचे वाहन चालविण्याचे परवानेही रद्द होणार असून करवाई झालेल्यांना न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

दि. ०२/०१/२३

(३) सकाळ पृ. क्र. ०७



विरार : वसईमधील नरवीर चिमाजी आप्पा मैदानावर वसईकरांनी मोठी गर्दी करत नवीन वर्षाचे जल्लोषात स्वागत केले.

# वसईत नववर्षाचे जल्लोषात स्वागत

विरार, ता. १ (बातमीदार) : सरत्या वर्षाला निरोप देत वसईकरांनी नववर्षाचे जल्लोषात स्वागत केले. यावेळी संपूर्ण वसई-विरार शहरात उत्साहाचे वातावरण होते.

वसई तालुका कला-क्रीडा महोत्सवाची शनिवारी सांगता झाली. यावेळी वसईच्या नरवीर चिमाजी आप्पा मैदानावर गर्दी झाली होती. ही गर्दी सरत्या वर्षाला निरोप देण्याबरोबरच नवीन वर्षाच्या स्वागतासाठी झाली होती. यावेळी नवीन वर्षाच्या स्वागताला फटाक्यांची आतषबाजीही बघायला मिळाली. यावेळी आमदार हितेंद्र ठाकूर, क्षितिज ठाकूर, राजेश पाटील, माजी महापौर राजीव पाटील, पंकज ठाकूर, प्रवीण शेट्टी, कला-क्रीडा महोत्सवाचे प्रकाश वनमाळी आदी उपस्थित होते.

## बोर्डीतही पर्यटकांची गर्दी

बोर्डी (बातमीदार) : सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी बोर्डीत पर्यटकांची मोठी गर्दी झाली होती. बोर्डी परिसरातील सर्वच्या सर्व हॉटेल व कृषी पर्यटन केंद्र पर्यटकांनी भरली होती. शनिवारी मनसोक्त आनंद लुटल्यानंतर रविवारी पर्यटक परतीच्या प्रवासाला रवाना झाले; तर सुरक्षेच्या दृष्टीने घोलवड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी रवींद्र पारखे यांनी चोख बंदोबस्त तैनात केला होता.

दि. ०२/०९/२२

(७) सकाळ पृ. भाग क्र. ०१



**भाईंदर :** लक्ष्मीपार्क येथील जागा जप्त केलेल्या वाहनांसाठी अपुरी पडत आहे.

# जप्त वाहने घेऊन जा, अन्यथा लिलाव करू

## वाहतूक पोलिसांचा इशारा

भाईंदर, ता. १ (बातमीदार) : मिरा-भाईंदरमध्ये बेवारस वाहने जप्त करण्याची मोहीम पोलिसांचा वाहतूक विभाग राबवत आहे. पोलिसांनी यातील २१७ वाहनांची विल्हेवाट लावण्याचा निर्णय घेतला आहे. पोलिसांच्या ताब्यात असलेली ही वाहने सहा महिन्यांत घेऊन जावीत, अन्यथा या वाहनांचा लिलाव करण्यात येईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

काशिमिरा वाहतूक विभागाकडून बेवारस वाहने, वाहतुकीस अडथळा ठरणारी वाहने जप्त करण्यात येत आहेत. ही वाहने महापालिकेने उपलब्ध करून दिलेल्या मिरा रोडच्या लक्ष्मीपार्क येथील बंदिस्त जागेत ठेवण्यात आली आहेत. वाहने जप्त करण्याची प्रक्रिया सुमारे दहा वर्षांपासून सुरू आहे. त्यामुळे त्याठिकाणी मोठ्या संख्येने विविध प्रकारची वाहने जमा झाली असून पोलिसांना ही जागा अपुरी पडू लागली आहे. या जप्त वाहनांमध्ये ११४ दुचाकी, ९० रिक्षा व १३ चार चाकी वाहनांचा समावेश आहे.

### आवाहन

ज्यांची ही वाहने असतील त्यांनी कागदपत्रासह काशिमिरा वाहतूक शाखेच्या पोलिस निरीक्षकांशी संपर्क साधावा अथवा pitrfkashimira.mb-vv@mahapolice.gov.in या ई मेलवर अथवा ७७१००१२८९७ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून वाहनाची ओळख पटवावी व ती ताब्यात घ्यावीत, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

दि: ०२/०१/२०२३.

(५) सकाळ पु. पान नं.०१

मिरा-भाईंदर, वसई-विरारमधून ७१ हजार अर्ज; पहिल्यांदाच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

# आयुक्तालयासाठी आजपासून थेट पोलिस भरती प्रक्रिया

भाईंदर, ता. १ (बातमीदार) : मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयात शिपाई आणि चालक या पदांसाठी सोमवारपासून (२ जानेवारी) थेट भरती प्रक्रिया सुरू होत आहे. ही प्रक्रिया दोन महिने सुरू राहणार असून या भरतीचे वैशिष्ट्य म्हणजे पहिल्यांदा आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने ही भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया जलद व पारदर्शक पद्धतीने पार पडणार असल्याचा दावा पोलिसांनी केला. तसेच गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी संपूर्ण प्रक्रियेवर कॅमेऱ्याची नजर असणार आहे.



मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच थेट भरती होत आहे. यात एकंदर ९९६ पोलिस शिपाई आणि १० चालक पदांसाठी ही भरती केली जाणार आहे. या पदांसाठी सुमारे ७१ हजार अर्ज प्राप्त झाले आहेत. भाईंदर पश्चिम येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान याठिकाणी सोमवारपासून ही प्रक्रिया सुरू होणार असून ती २८ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. ही भरती प्रक्रिया पहिल्यांदाच आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने होणार आहे. यासाठी येणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला संगणकीय चीप लावण्यात येणार असून या प्रत्येक उमेदवाराची नोंद संगणकात होणार आहे. हैदराबादच्या 'ई-सॉफ्ट' या कंपनीला हे कंत्राट देण्यात आले आहे. यात प्राप्त झालेल्या ७१ हजार ९५१ अर्जांमध्ये ५९ हजार ८४७ पुरुष व १२ हजार १०४ महिला उमेदवारांचा समावेश आहे. पहिल्या टप्प्यात केवळ पुरुष उमेदवारांची निवड चाचणी होणार असून त्यानंतर महिला उमेदवारांची निवड केली जाणार आहे. उमेदवारांसाठी स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, तसेच खाद्यपदार्थांचे स्टॉल आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## कडक सुरक्षा व्यवस्था

भरती प्रक्रियेसाठी कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. अतिरिक्त पोलिस आयुक्तांच्या नेतृत्वाखाली, मुख्यालय उपायुक्त, तीन सहाय्यक आयुक्त, २१ पोलिस निरीक्षक, ३६ सहाय्यक पोलिस निरीक्षक व उपनिरीक्षक आणि २३१ पोलिस कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

गेल्या दोन-तीन वर्षांत पोलिस भरती झाली नव्हती. त्यामुळे या भरतीमध्ये मोठ्या संख्येने उमेदवार येणार असल्यामुळे ही प्रक्रिया आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने करण्याच्या सूचना वरिष्ठ पातळीवरून देण्यात आल्या आहेत. तसेच भरतीसाठी कोणीही पैशांची मागणी करत असेल तर उमेदवारांनी तातडीने त्याची माहिती पोलिसांना द्यावी.

- प्रकाश गायकवाड, उपायुक्त, मुख्यालय, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस

## अशी होणार भरती

सकाळी उमेदवारांची नोंदणी प्रक्रिया सुरू होणार आहे. त्यात उमेदवाराची बायोमेट्रीक हजेरी घेतली जाईल. त्यानंतर चेस्ट क्रमांक दिला जाईल, त्यात संगणकीय चीप बसवलेली असणार आहे. सर्वप्रथम उंची व छाती मोजली जाणार आहे. ही मोजणी चीपमधील सेन्सरद्वारे नोंदली जाणार आहे. यात पात्र उमेदवारालाच पुढील चाचणीसाठी पाठवले जाईल. त्यात पुरुष उमेदवाराला १६०० मीटर व १०० मीटर धावणे व गोळाफेक तसेच महिला उमेदवारांना ८०० मीटर व १०० मीटर धावणे व गोळाफेक या चाचण्यांचा समावेश आहे. या चाचण्यांची चीपच्या माध्यमातून संगणकात नोंद केली जाणार आहे.

## कॅमेऱ्यांची नजर

संपूर्ण पोलिस भरती प्रक्रियेवर पन्नास कॅमेऱ्यांची बारीक नजर असणार आहे. यात तीन पद्धतीचे कॅमेरे असणार आहेत. पहिले म्हणजे जागोजागी पोलिसांचे सीसीटीव्ही असणार आहेत. दुसरे म्हणजे भरती प्रक्रिया पार पाडणाऱ्या कंपनीचे कॅमेरे असणार आहेत. याशिवाय जागोजागी हँडीकॅमद्वारेही चित्रीकरण करण्यात येणार आहे.

दि.०२/०१/२३

(६) लोकमत पु. भा. नं. ०४

# तोडलेल्या बेकायदा बांधकामांचे पुन्हा इमले!

एक्सपर्ट व्ह्यू

धीरज परब
लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा-भाईंदर महापालिकेने जमीनदोस्त केलेल्या एका बेकायदा लॉजचे पुन्हा बेकायदा बांधकाम करून त्यात वैश्या व्यवसाय सुरू झाल्याचा प्रकार पोलिसांच्या कारवाईनंतर निदर्शनास आला आहे. मुळात शहरात अशी असंख्य बेकायदा बांधकामे आहेत, जी तोडल्यानंतरही पुन्हा बांधली गेली आहेत आणि त्याचा वापर-विक्री सुरू आहे.

बेकायदा बांधकामे तोडल्याची आकडेवारी महापालिका ठेवते, पण तोडलेली बांधकामे पुन्हा उभी राहिली आहेत. त्याचाही आढावा पालिकेला घ्यावा लागणार आहे.



बेकायदा बांधकामांमुळे शहरांचा बट्ट्याबोळ होत आहे. मूलभूत नागरी सुविधांवर मोठा ताण पडत आहे. बेकायदा बांधकामाच्या खरेदी विक्रीत सर्वसामान्य लोकांची मोठी फसवणूक होते. मीरा-भाईंदर महापालिकेने आलेल्या अनेक तक्रारींवर कारवाई करून बेकायदा बांधकामे तोडली आहेत. असंख्य बेकायदा बांधकामांना पालिका-राजकारण्यांचा वरदहस्त असल्याने कारवाई केली गेलेली नाही, हे कटू सत्य आहे.

कच्ची-पक्की बांधकामे तोडली, याची नोंद महापालिका करते; मात्र तोडलेली बहुतांश बेकायदा बांधकामे पुन्हा उभी राहिली आहेत. इतकी बांधकामे तोडल्याचा आकडा सांगणारी पालिका त्या पुन्हा झालेल्या बेकायदा बांधकामांची महापालिका कधीच नोंद करत नाही.

काशिमीराच्या माशाचा पाडा-डाचकूल पाडा भागात तत्कालीन आयुक्त विक्रमकुमार असताना, शेकडो बेकायदा बांधकामे कारवाई करून जमीनदोस्त केली होती. या बेकायदा बांधकामाच्या खरेदी विक्रीत सर्वसामान्य लोकांची मोठी फसवणूक होते.

विक्रमकुमार गेल्यानंतर आता त्याच परिसरात दुपटीने बेकायदा बांधकामे उभी राहिलेली आहेत व नव्याने होत आहेत. हा परिसर दुसरी धारावीची झोपडपट्टी म्हणून ओळखला जातो. अशाचप्रकारे अनेक बार-लॉज, इमारती, बैठी घरे, चाळी आदी विविध प्रकारची बेकायदा बांधकामे पुन्हा उभी राहिली आहेत.

## अधिकारी, राजकारण्यांची चिडीचूप

नव्याने झालेल्या आणि पुन्हा उभ्या राहिलेल्या बेकायदा बांधकामांवर कारवाईसाठी महापालिकेचे प्रभाग समितीतील अधिकाऱ्यांपासून बडे वरिष्ठ अधिकारी चिडीचूप आहेत. राजकारणीही चकार शब्द काढत नाहीत. उलट या बांधकामांना वीज, पाणी, करआकारणीपासून सर्व सुविधा दिल्या गेल्या आहेत. न्यायालय व शासनाने बेकायदा बांधकामांबाबत कायदे-नियम कितीही कडक केले तरी, अंमलबजावणी करणारी प्रशासकीय व लोकप्रतिनिधींची यंत्रणाच बरबटलेली आहे.

(७) पुण्यनगरी पु. भा. नं. ०१

# ड्रंक ॲण्ड ड्राइव्हप्रकरणी १७० जणांवर कारवाई



नालासोपारा : मीरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयाच्या हद्दीत दारू पिऊन वाहन चालवणाऱ्या १७० जणांवर कारवाई करण्यात आली. ३१ डिसेंबरच्या रात्री आणि नववर्षाच्या स्वागतासाठी जल्लोष पाहायला मिळाला. या वेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी मीरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयातील ३ झोनमध्ये कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. झोन १ च्या काशिमीरा वाहतूक विभागात ५६ तळीरामांवर कारवाई करण्यात आली. झोन २ आणि वसई वाहतूक विभागाने ७१ तळीरामांवर कारवाई करण्यात आली, तर झोन ३ आणि विरार वाहतूक विभागाने ४३ तळीरामांवर कारवाई केली असून, १७० जणांवर कारवाई करण्यात आली.

(८) पुण्यनगरी पु. भा. नं. ०५.

# मद्यप्राशन केलेल्या ४८ वाहनचालकांवर कारवाई

मीरा रोड : मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकडून नागरिकांनी ३१ डिसेंबरला नववर्षाचे स्वागत करताना नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले होते. तरीसुद्धा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ४८ मद्यपी वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाई केली.

काशिमीरा वाहतूक शाखेकडून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येते. २५ डिसेंबरपासून शहरात ठिकठिकाणी नाकाबंदी करत ड्रंक अँड ड्राइव्ह प्रकरणी ६२ जणांवर कारवाई करण्यात आली. एका आठवड्यात सुमारे १० मद्यपी वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली, अशी माहिती काशिमीरा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश भामे यांनी दिली. पहाटे ५ पर्यंत पोलिसांनी विविध ठिकाणी केलेल्या नाकाबंदीदरम्यान वाहनांची तपासणी करण्यात आली होती. यात वाहतूक शाखेकडून दुचाकी, कार अशा एकूण ४८ मद्यपी वाहनचालकांवर स्थानिक पोलिसांच्या मदतीने कलम १८५, १८८ प्रमाणे ड्रंक अँड ड्राइव्हची कारवाई करण्यात आली. ही कारवाई करण्यासाठी एकूण १५ ब्रीथ अनालायझर मशीनचा वापरण्यात आला. काशिमीरा वाहतूक शाखेने दारू पिऊन वाहन चालवणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी चेक नाका, सिल्व्हर पार्क, गोल्डन नेस्ट, उत्तन नाका, वरसावे, काशिमीरा, एस के स्टोन या ठिकाणी नाकाबंदी लावली होती. पोलीस आयुक्तालयाकडून मुख्य बाजारपेठा, चौक, समुद्रकिनारे येथे पोलीस बंदोबस्त, नाकाबंदी, पेट्रोलिंग करण्यात आले.

दि. ०२।०१।२३.

पुढारी पान नं. ०१

# अजित पवारांनी तारतम्य बाळगावे : मुख्यमंत्री

## ‘छ. संभाजीराजे धर्मवीर नव्हते’ या वक्तव्यावर घणाघाती टीका



मुंबई : पुढारी वृत्तसेवा

छत्रपती संभाजी महाराजांबद्दल विधानसभेतील विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केलेले विधान निंदाजनक असल्याची टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. संभाजी महाराजांना ‘धर्मवीर’ ही पदवी तुम्ही-आम्ही दिलेली किंवा आजची नाही. त्यांच्या बलिदानामुळे वर्षानुवर्षे ते धर्मवीर म्हणून ओळखले जातात. त्यामुळे अजित पवार यांनी बोलताना तारतम्य बाळगायला हवे, असा सल्ला मुख्यमंत्री शिंदे यांनी रविवारी दिला.

- अजित पवारांच्या वक्तव्यावर भाजप, शिंदे गट, हिंदुत्ववादी संघटना आक्रमक
- संभाजीराजे धर्मवीर-स्वराज्यरक्षक : फडणवीस
- अजित पवारांच्या विधानावर संतप्त प्रतिक्रिया

विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात विधानसभेतील भाषणात अजित पवार यांनी छत्रपती संभाजी महाराज यांचा उल्लेख स्वराज्यरक्षक असा करताना, त्यांना काही लोक धर्मवीर म्हणत असल्याचे वक्तव्य केले होते. या वक्तव्यावरून भाजप, शिंदे गट तसेच हिंदुत्ववादी संघटनांनी अजित पवारांना टीकेचे लक्ष्य केले आहे.

‘छत्रपती संभाजी महाराजांना आपण स्वराज्यरक्षक म्हणतो. ते धर्मवीर नव्हते. छत्रपती संभाजी महाराजांनी धर्माचा कुठे पुरस्कार केला नाही. शिवाजी महाराजांनीही हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. काही जण जाणीवपूर्वक धर्मवीर... धर्मवीर असा उल्लेख करतात,’ असे अजित पवार यांनी म्हटले होते. त्यांच्या या विधानावरून राजकीय विरोधकांनी टीका करायला सुरुवात केली आहे. तर, सोशल मीडियावरही धर्मवीर या उल्लेखावरून तीव्र वादंग सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही अजित पवार यांच्या विधानावर घणाघती टीका केली.

/...२

पान नं. ०२.

## अजित पवारांनी तारतम्य बाळगावे : मुख्यमंत्री

छत्रपती संभाजी महाराजांबद्दल बोलताना विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सर्व माहिती घेऊन बोलायला हवे. काही तारतम्य बाळगायला हवे होते, एवढीच माझी अपेक्षा असल्याचे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

**संभाजीराजे धर्मवीर-स्वराज्यरक्षक : फडणवीस**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही अजित पवार यांच्या वक्तव्याचा समाचार घेतला. ‘छत्रपती संभाजी महाराजांनी धर्माचे रक्षण केले, धर्म, स्वधर्म आणि हिंदू धर्माचे रक्षण केले. त्यांना औरंगजेबाने का मारले, असा प्रश्न उपस्थित करतानाच, संभाजी महाराजांना धर्मांतर करण्यासाठी सांगितले गेले; पण त्यांनी मान्य केले नाही. स्वदेश, स्वभूमी आणि स्वधर्मासाठी हालअपेष्टा होऊन त्यांचे बलिदान झाले. त्यांच्या शरीराचे अक्षरशः तुकडे केले; तरी छत्रपती संभाजी महाराजांनी स्वधर्म, स्वराष्ट्राची भाषा सोडली नाही. म्हणून अजित पवार आणि त्यांच्या विचारांच्या लोकांनी कितीही प्रयत्न केला; तरी छत्रपती संभाजी महाराज हे स्वराज्यरक्षक तर होते; पण ते धर्मवीरदेखील होते,’ असे फडणवीस म्हणाले. ‘धर्मवीर’वरून भाजप तसेच शिंदे गटाच्या नेत्यांनी अजित पवार यांच्यावर टीकेची झोड उठविली आहे. ‘अजितदादा, आपल्या स्वार्थासाठी सर्व ठिकाणी तडजोड करणाऱ्यांना काय कळणार धर्मासाठी त्याग काय असतो ते? होय धर्मवीरच! छत्रपती धर्मवीर संभाजी महाराजांना मानाचा मुजरा,’ असे ट्विट करत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी अजित पवारांवर टीका केली आहे.

**राजीनाम्याची मागणी**

अजित पवार यांनी विरोधी पक्षनेतेपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी भाजप आमदार नितेश राणे यांनी केली आहे. याशिवाय, विविध हिंदुत्ववादी संघटनांनीही अजित पवारांवर टीकेची झोड उठवायला सुरुवात केली आहे.

लोकमत

# देव तरी कुठे सुरक्षित? लाखांचा मुद्देमाल लंपास




**मंगेश कराळे । लोकमत न्यूज नेटवर्क**

**नालासोपारा :** माणसांवर संकट आले की आपण ज्याच्याकडे धाव घेतो, असे देवदेखील चोरट्यांपासून सुटलेले नाहीत. चोरटे मूर्तीसह दानपेटीही चोरून नेतात. २०२२ या वर्षात वसई तालुक्यात मंदिरात चोरी झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्यात देवांच्या मूर्तीसह लाखोंचा मुद्देमाल चोरून नेला आहे. पोलिसांनी गुन्हे दाखल करून या गुन्ह्यांची उकल करत चोरीला गेलेला ऐवज परत केलेला आहे.

## ०७ मंदिरांमध्ये वर्षभरात चोरी

वसई-विरार शहरात दररोज घरफोडी, वाहनचोरीच्या घटना घडतच आहेत. पण २०२२ या वर्षात वसई तालुक्यात देवही सुरक्षित नसल्याचे दिसून आले. वसईतील सात मंदिरांमध्ये चोरट्यांनी डल्ला मारला आहे. याप्रकरणी स्थानिक पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

## लाखोंचा मुद्देमाल लंपास

चोरट्यांनी दानपेटीतील रोख रक्कम, देवाचे मुकुट, पितळेची भांडी आणि देवाच्या चांदीच्या व पंचधातूंच्या मूर्तीदेखील चोरून नेल्या आहेत.

## मुद्देमाल परत मिळविण्यात आले यश

- पोलिस ठाण्यात मंदिरात चोरी झालेल्या गुन्ह्यांपैकी दोन गुन्ह्यांत चोरण्यात आलेला लाखोंचा मुद्देमाल चोरट्यांकडून परत मिळविण्यात यश आले आहे. पोलिसांनी तो मुद्देमाल मंदिरांच्या व्यवस्थापकाला परत केला आहे.

## अनेक मंदिरांमध्ये ना सीसीटीव्ही ना सुरक्षारक्षक

वसई तालुक्यातील अनेक मंदिरांमध्ये अजूनपर्यंत सुरक्षारक्षक किंवा सीसीटीव्हीची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली नाही. याचाच गैरफायदा घेत चोरटे या मंदिरांत चोरी करण्याचा प्रयत्न करतात. मंदिरातील लाखोंचा मुद्देमाल चोरून नेल्याप्रकरणी पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

मंदिरात चोरी हा नागरिकांच्या भावनिकतेचा विषय असल्याने असा गुन्हा घडताच पोलिस यंत्रणा कामाला लावावी लागते. त्यातूनच मंदिरातील चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. त्यासाठी पोलिसांना खबऱ्यासह तांत्रिक तपास व संशयाचादेखील आधार घ्यावा लागतो.


**- पोलिस अधिकारी**

## देवाचीही भीती राहिली नाही

कामणच्या मोरीगाव जैन मंदिरावर २५ सप्टेंबरला मध्यरात्री पाच दरोडेखोरांनी दरोडा टाकल्याची घटना घडली होती. सुरक्षारक्षकाला मारहाण करून रस्सीने बांधले. मुख्य दरवाजा न तुटल्याने मागील दुसरा दरवाजा तोडून मंदिरात प्रवेश करून दानपेटीतील रक्कम चोरली होती.

नारंगी फाटा येथील मंदारेश्वर महागणपती मंदिरात १३ सप्टेंबरला घरफोडी झाली होती. मंदिराच्या दरवाजाचे लॉक तोडून गणेशमूर्तीचा १३ हजारांचा पाव किलो चांदीचा मुकुट, अंदाजे दोन लाख रुपये असलेली दानपेटी चोरून नेली होती.

लोकमत



# नाक्यानाक्यावर तपासणी

नालासोपारा : थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर शनिवार सकाळपासूनच वसई-विरारसह नालासोपारा शहरात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त पाहायला मिळाला. हॉटेल, ढाबे, मॉल्स, फार्महाऊस, समुद्रकिनाऱ्यांसह खासगी सोसायट्यांमध्ये पार्ट्यांचे आयोजन केले होते. त्यामुळे शहरातील रस्त्यावर रात्री उशिरापर्यंत नागरिकांची तसेच वाहनांची वर्दळ होती. शहरात कोणतीही अनुचित घटना घडू नये, या हेतूने शनिवारी रात्री ठिकठिकाणी नाक्यानाक्यावर वाहनांची तसेच वाहनचालकांची तपासणी करण्यात येत होती.

Hello Vasai
Page No. 3 Jan 02, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी वसईत अपघात

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : वसईत नववर्षाच्या पहिल्याच दिवशी एक अपघाताची घटना घडली आहे. रविवारी सकाळी वसई पूर्व-पश्चिमेला जोडणाऱ्या अंबाडी रोड रेल्वे उड्डाणपुलावर कारने एक दुचाकी व कंटेनरला जोरदार धडक दिल्याने अपघात घडला आहे. या घटनेत दुचाकीचालक व कारमधील तिघेजण जखमी झाले आहेत.

वसई पश्चिमेकडून पूर्वेला अंबाडी रोड रेल्वेपुलावर कारचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने त्याने एका दुचाकीला जोरदार धडक दिली. त्यानंतर कार समोरून येणाऱ्या कंटेनरला उजव्या बाजूला धडकली. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी दुचाकीचालक व कारमधील तिघेजण जखमी झाले आहेत. कारमधील तिघेजण आदल्या दिवशी ३१ डिसेंबरच्या पार्टीनंतर मद्यधुंद अवस्थेत असल्याची माहिती समोर आली आहे. त्यात कारचा वेग जास्त असल्यामुळे चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला. कारमधील एअर बॅग वेळेत उघडल्याने तिघेजण बचावले. माणिकपूर पोलिस अधिक तपास करीत आहेत.

Hello Vasai
Page No. 1 Jan 02, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# बालकांच्या अपहरणाचे १०६ गुन्हे उघडकीस

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : अपहरण झालेल्या बालकांच्या दाखल असलेल्या गुन्ह्यांचा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या नालासोपारा विभागातर्फे समांतर तपास करून २०२२ या वर्षात पोलिस अधिकारी आणि अंमलदारांनी एकूण १०६ गुन्ह्यांची उकल केली आहे. त्यात ३८ मुले व ७४ मुली अशा एकूण ११२ मुलांचा शोध घेऊन त्यांना संबंधित तपास अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करून त्यांच्यामार्फत पालकांच्या ताब्यात देण्यात यश आले आहे.

२०२२ या वर्षात अवैध वेश्याव्यवसायाशी संबंधित एकूण १८ कारवाया केल्या. त्यात २३ आरोपींवर कारवाई करून २३ महिला व ७ अल्पवयीन मुलींची वेश्याव्यवसायातून सुटका केलेली आहे. अंमली पदार्थ कायद्यांतर्गत दोन केसेस, बालकामगार कायद्यांतर्गत ७ केसेस करून ११ आरोपींवर कारवाई करून १७ बालकामगारांची सुटका केली आहे. तसेच, चार बोगस डॉक्टरांवर कारवाई करून इतर तीन अवैध धंद्यांवर कारवाई करून आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलिस उपआयुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहायक पोलिस आयुक्त (गुन्हे) अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक संतोष चौधरी, उपनिरीक्षक प्रकाश निकम, हवालदार बापू पवार, राजेश पद्याने, महेंद्र शेट्टे, रोशन किणी, श्याम शिंदे, सुनील पागी, साक्षी डोईफोडे, सुप्रिया तिवले, पाटील, जगदाळे यांनी उत्कृष्टरीत्या कामगिरी पार पाडली आहे.

Hello Vasai
Page No. 1 Jan 02, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

## जिल्ह्यात आजपासून पोलिस भरती प्रक्रिया राबविणार

# पदे ९९६, अर्ज आले ७४,४५८!

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयातील प्रथम भरती प्रक्रियेला २ जानेवारीपासून प्रत्यक्षात मैदानी चाचणीला सुरुवात होणार आहे. शिपाई आणि वाहनचालक पदांच्या ९९६ जागांसाठी भरती होणार असून त्यासाठी ७४ हजार ४५८ उमेदवारांचे अर्ज दाखल झाले आहेत. २ जानेवारीपासून ते २८ फेब्रुवारीपर्यंत भाईंदर पश्चिमेकडील नेताजी सुभाषचंद्र बोस या मैदानावर ही चाचणी घेण्यात येणार आहे. त्यासाठी पोलिस आयुक्तालयाकडून तयारी पूर्ण झाली आहे. पोलिस आयुक्त मधुकर पांडे, अतिरिक्त पोलिस आयुक्त श्रीकांत पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली शेकडो अधिकारी-अंमलदारांचा बंदोबस्त भरती प्रक्रियेसाठी असणार आहे.

१ ऑक्टोबर २०२० रोजी मीरा-भाईंदर वसई- विरार पोलिस आयुक्तालयाची स्थापना करण्यात आली. तेव्हापासून शिपाईपदापासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंतच्या कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. काही महत्त्वाची पदे ही विविध जिल्ह्यांतून अधिकाऱ्यांची बदली करत भरण्यात आली होती. त्याचप्रमाणे महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांचीदेखील मदत घेतली गेली. मात्र, त्यानंतरही मनुष्यबळाचा अभाव असल्याने राज्य सरकारने भरती प्रक्रियेला हिरवा कंदील दाखवल्यानंतर शिपाईपदाच्या ९८६, तर शिपाई वाहनचालक पदाच्या दहा अशा एकूण ९९६ पदांसाठी नोव्हेंबरमध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती.

पोलिस भरतीकरिता आलेल्या उमेदवारांना ८०० मीटर व १,६०० मीटरकरिता भाईंदर पश्चिम येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानाच्या भोवतालच्या सार्वजनिक शौचालय ते उत्तन रोडवरील पाण्याची टाकीपर्यंत असलेल्या रोडवर डिव्हायडरच्या डाव्या बाजूने पळवण्यात येणार आहे. स्पर्धा चालू असताना वाहतूक कोंडी व अपघात होऊ नये याकरिता नमूद स्पर्धेच्या कालावधीमध्ये दुसरा व चौथा शनिवार व सर्व रविवार हे शासकीय सुटीचे दिवस वगळून इतर दिवशी सकाळी ५ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत संबंधित रस्त्यांवर सर्व प्रकारच्या वाहनांना पार्किंगसाठी व प्रवेशास मनाई करण्यात आली आहे. एका जागेसाठी दहा उमेदवार अशा पद्धतीने निवड प्रक्रिया करत दहा हजार अथवा त्याहून अधिक प्रमाणात उमेदवार लेखी परीक्षेसाठी पाठविले जाणार आहेत.



पोलिस भरतीची तयारी करणाऱ्या तरुणांना केले जात असलेले मार्गदर्शन.

### कुठल्या वर्गासाठी किती जागा?

यात खुल्या वर्गासाठी केवळ २७९ तर अनुसूचित जाती-जमाती, विशेष मागासवर्ग आणि इतर मागासवर्गासाठी ७१७ पदे आहेत. तसेच या भरतीत महिलांसाठी ३० टक्के, खेळाडू ५ टक्के, निवृत्त पोलिसांच्या मुलांसाठी, प्रकल्पग्रस्तांसाठी ३ टक्के तर भूकंपग्रस्तांसाठी २ टक्के, माजी सैनिकांसाठी १५ टक्के आणि गृहरक्षक म्हणजेच होमगार्ड ५ टक्के, तसेच अनाथांसाठी १ टक्का जागा आरक्षित आहेत.

Hello Vasai
Page No. 1 Jan 02, 2023
Powered by: erelego.com

# दुकान से साढ़े आठ लाख के मोबाइल चोरी

■ निसं, वसई: वालीव पुलिस स्टेशन क्षेत्र के चिंचोटी इलाके में अज्ञात चोरों ने एक मोबाइल शॉप का शटर तोड़कर वहां से लगभग साढ़े आठ लाख रुपये कीमत के मोबाइल चोरी कर लिए और फरार हो गए। दुकानदार की शिकायत पर पुलिस ने आरोपियों के खिलाफ मामला दर्ज कर लिया है। जानकारी के अनुसार, नालासोपारा पूर्व ठाकुर नगर निवासी अमित नरेश यादव ने पुलिस को बताया कि उसकी कामन-भिवंडी रोड स्थित चिंचोटी, टोली नाका के पास मोबाइल की दुकान है। बीते रोज दुकान का शटर तोड़कर चोरों ने अलग-अलग कंपनियों के 72 मोबाइल चोरी कर लिए।

# सड़कों के अवैध कट दे रहे हैं हादसों को दावत!

## स्टेशन से हाईवे जानेवाली सड़क पर रहता है ट्रैफिक जाम

■ सुरेंद्र नेगी, वसई

**नालासोपारा स्टेशन** से मुंवई अहमदावाद हाईवे जाने वाले मुख्य मार्ग पर जगह-जगह अवैध कट वनाए गए हैं। इन अवैध कटों से आए दिन सड़क हादसे हो रहे हैं। कई राहगीर भी वाहनों की चपेट में आ चुके हैं। तेज रफ्तार वाहन भी दुर्घटना का शिकार हो चुके हैं, जवकि परिसर में भारी ट्रैफिक जाम की समस्या भी वढ़ गई है।

मुंवई अहमदावाद हाईवे की ओर जानेवाली मुख्य सड़क पर हो रहे हादसों के वाद भी संवंधित विभाग खामोश है। पीडव्ल्यूडी डिपार्टमेंट का कहना है कि हमने डिवाइडर लगाए थे, लेकिन स्थानीय दुकानदारों व कारखाना संचालकों ने अपने फायदे के लिए कई जगहों पर डिवाइडर को तोड़कर अवैध कट निकाल दिया है।

पूर्व नगरसेवक पंकज पाटील ने वताया कि दस किमी. लंवी इस सड़क पर सौ से अधिक कट निकाले गए हैं। इससे आए दिन हादसे हो रहे हैं। अवैध कट की वजह से वाहन चालक जल्दवाजी के चक्कर मे रॉन्ग साइड का भी इस्तेमाल करते हैं, जिससे आए दिन छोटे-वड़े हादसे होते हैं। कहीं से भी वाहनों को ले जाने से यहां पर ट्रैफिक जाम लग जाता है।

पाटील ने वताया कि यहां की अधिकतर कंपनियों, कारखानों व स्थानीय दुकानदारों ने अपने फायदे के लिए डिवाइडर को हटा कर अवैध तरीके से कट निकाले हैं। ऐसे लोगों पर कड़ी कार्रवाई होनी चाहिए। नालासोपारा से हाइवे जाने वाले मार्ग पर दस-दस मीटर की दूरी पर अवैध कट वनाए गए हैं। पीडव्ल्यूडी व पुलिस विभाग को कई वार इस मामले की शिकायत करने के वाद भी यह अवैध कट वंद नहीं किए गए। शनिवार की रात देर रात अवैध कट से रॉन्ग दिशा में जा रही एक कार दुर्घटनाग्रस्त हो गई। हालांकि इसमें कोई जनहानि नहीं हुई, लेकिन कार वुरी तरह क्षतिग्रस्त हो गई।










> ट्रैफिक विभाग की ओर से अवैध कट वाली जगहों का सर्वे हो चुका है। जल्द ही सारे अवैध कट बंद किए जाएंगे।
>
> - दादाराम करांडे (पुलिस निरीक्षक, ट्रैफिक विभाग जोन 3)

# 'अलीबाबा दास्तान ए काबूल' के सेट पर छाया सन्नाटा





■ **निसं,वसई:** तुनिशा सुइसाइड मामले में उसके वॉयफ्रेंड शीजान खान को जेल भेज दिया गया है। पुलिस ने धारावाहिक 'अलीवावा दास्तान ए कावूल' के सेट पर शूटिंग करने से रोक लगा दी है। इस घटना के वाद से यहां के कई वर्करों ने काम छोड़ दिया है। इस सीरियल में शीजान खान और तुनिशा लीड रोल में थे। जानकारी के अनुसार, नायगांव के कामन - भिवंडी रोड स्थित भजनलाल स्टूडियो में गत शनिवार धारावाहिक की लीड ऐक्ट्रेस तुनिशा शर्मा ने मेकअप रूम में फांसी लगाकर खुदकुशी कर ली थी। इस मामले में वालीव पुलिस ने उसके वॉयफ्रेंड शीजान खान को गिरफ्तार किया है। घटना के दिन से स्टूडियो में शूटिंग पर रोक लगी है। स्टूडियो में काम करने वालों के वयान दर्ज किए जा रहे हैं। सेट पर काम करने वाले कई मजदूरों के दूसरी जगह चले जाने से पिछले एक हफ्ते से यहां पर सन्नाटा पसरा है।

# बिना हेलमेट पहने हुए वाहन चलाने वाले 2465 पकड़े गए

**रिपोर्टर, मुंबईः** नए साल के जश्न के दौरान मुंबई ट्रैफिक पुलिस ने नाकाबंदी और सुरक्षा के पुख्ता इंतजाम किए थे। चेकिंग के दौरान शराब पीकर गाड़ी चलाने के आरोप में जहां 156 वाहन चालकों के खिलाफ कार्रवाई की गई, तो वहीं बिना हेलमेट पहन कर मोटरसाइकिल चलाने के आरोप में 2,465 लोगों के चालान काटे गए हैं। इसके अलावा, नो पार्किंग जोन में वाहनों को पार्क करने के आरोप में 3,087 लोगों पर जुर्माना लगाया गया है। साथ ही 66 लोगों के खिलाफ लापरवाही से वाहन चलाने पर कार्रवाई हुई है।

यातायात पुलिस ने सिग्नल तोड़ने पर 679 चालकों के खिलाफ कार्रवाई की है, जबकि दोपहिया वाहनों पर 3 लोगों को बिठाने के आरोप में पुलिस ने 274 लोगों का चालान काटा है। कुल मिलाकर ट्रैफिक नियमों से संबंधित 8678 मामले पुलिस ने दर्ज किए हैं।

एक अधिकारी ने बताया कि जश्न के दौरान सुरक्षा व्यवस्था बढ़ा दी गई थी। कई सड़कों के ट्रैफिक व्यवस्था में बदलाव किए गए थे, जो 31 दिसंबर की रात 8 बजे से 1 जनवरी की सुबह 6 बजे तक लागू रही। महानगर में 100 ठिकानों पर नाकाबंदी की गई थी, जबकि कानून व्यवस्था का पालन करवाने के लिए बड़ी संख्या में पुलिसकर्मियों को भी तैनात किया गया था। यातायात नियमों का उल्लंघन करने वालों से निपटने के लिए शनिवार देर रात से रविवार तड़के तक सघन अभियान चलाया गया।

ट्रैफिक नियमों का पालन करवाने के लिए हर प्रमुख मार्गों पर जांच चौकियां बनाई गई थीं। किसी भी अप्रिय घटना से बचने के लिए नए साल की पूर्व संध्या पर गेटवे ऑफ इंडिया, मरीन ड्राइव, गिरगांव चौपाटी, जुहू बीच, बांद्रा बैंडस्टैंड समेत अन्य प्रमुख स्थानों पर 11,500 से अधिक सुरक्षाकर्मियों को तैनात किया गया था।



## न्यू ईयर पर पुलिस का ऐसा रहा ऐक्शन

| | |
|---|---|
| ड्रंक ऐंड ड्राइव | 156 |
| लापरवाही से गाड़ी चलाना | 66 |
| बिना हेलमेट | 2466 |
| ट्रिपल सीट | 274 |
| सिग्नल जंप | 679 |
| नो एंट्री | 635 |
| गलत दिशा में वाहन चलाना | 238 |
| नो पार्किंग | 3087 |
| टोइंग | 362 |
| कुल मामले | 8678 |

## नवी मुंबई में भी हुई कार्रवाई

निसं, मीरा-भाईंदरः नए साल के जश्न के दौरान एमबीवीवी पुलिस ने कुल 48 लोगों पर ड्रिंक ऐंड ड्राइव का मामला दर्ज किया है। पुलिस ने जगह-जगह नाकेबंदी की थी। बिगत एक सप्ताह में काशीमीरा ट्रैफिक विभाग ने कुल 110 लोगों पर ड्रिंक ऐंड ड्राइव का मामला दर्ज किया है। चेकनाका, सिल्वर पार्क, गोल्डन नेस्ट, उत्तन नाका, फाउंटेन, काशीमीरा समेत 12 जगहों पर नाकाबंदी की गई थी।

## वसई विरार में 114 केस

निसं, वसईः मीरा भाईंदर- वसई विरार आयुक्तालय के कमिश्नर मधुकर पांडे के आदेश पर आयुक्तालय क्षेत्र में सुरक्षा व्यवस्था को ध्यान रखते हुए कड़ा बंदोबस्त लगाया गया था। शनिवार को रात पुलिस ने वसई विरार में 114 ड्रिंक ऐंड ड्राइव के केस किए हैं। यह कार्रवाई ट्रैफिक विभाग जोन 2 व जोन 3 की ओर से की गई है।

## पालघर में ड्रिंक ऐंड ड्राइव के 35 केस

पालघर पुलिस ने ड्रिंक ऐंड ड्राइव के 35 मामले दर्ज किए हैं। साथ ही मोटर वीइकल ऐक्ट की धारा 185 के तहत 10 वाहन जब्त किए हैं और लगभग 27 हजार रुपये का जुर्माना वसूल किया है। पुलिस ने पालघर में 20, बोईसर में 11, तलासरी में 1 , डहाणू में 2 व मनोर में 1 केस किया है।

सकाळ



**भाईंदर :** लक्ष्मीपार्क येथील जागा जप्त केलेल्या वाहनांसाठी अपुरी पडत आहे.

# जप्त वाहने घेऊन जा, अन्यथा लिलाव करू

## वाहतूक पोलिसांचा इशारा

भाईंदर, ता. १ (बातमीदार) : मिरा-भाईंदरमध्ये बेवारस वाहने जप्त करण्याची मोहीम पोलिसांचा वाहतूक विभाग राबवत आहे. पोलिसांनी यातील २१७ वाहनांची विल्हेवाट लावण्याचा निर्णय घेतला आहे. पोलिसांच्या ताब्यात असलेली ही वाहने सहा महिन्यांत घेऊन जावीत, अन्यथा या वाहनांचा लिलाव करण्यात येईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

काशिमिरा वाहतूक विभागाकडून बेवारस वाहने, वाहतुकीस अडथळा ठरणारी वाहने जप्त करण्यात येत आहेत. ही वाहने महापालिकेने उपलब्ध करून दिलेल्या मिरा रोडच्या लक्ष्मीपार्क येथील बंदिस्त जागेत ठेवण्यात आली आहेत. वाहने जप्त करण्याची प्रक्रिया सुमारे दहा वर्षांपासून सुरू आहे. त्यामुळे त्याठिकाणी मोठ्या संख्येने विविध प्रकारची वाहने जमा झाली असून पोलिसांना ही जागा अपुरी पडू लागली आहे. या जप्त वाहनांमध्ये ११४ दुचाकी, ९० रिक्षा व १३ चार चाकी वाहनांचा समावेश आहे.

### आवाहन

ज्यांची ही वाहने असतील त्यांनी कागदपत्रासह काशिमिरा वाहतूक शाखेच्या पोलिस निरीक्षकांशी संपर्क साधावा अथवा pitrfkashimira.mb-vv@mahapolice.gov.in या ई मेलवर अथवा ७७१००१२८९७ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून वाहनाची ओळख पटवावी व ती ताब्यात घ्यावीत, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# पोलीस भरतीला आजपासून सुरुवात

## आधुनिक तंत्रज्ञानाचा होणार वापर, कॅमेऱ्यांची असणार नजर

भाईंदर - मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिसांच्या शिपाई व चालक पदांसाठी आजपासून (२ जानेवारी) थेट भरती प्रक्रियेला सुरुवात होत आहे. पोलीस आयुक्तालयाच्या स्थापनेनंतर प्रथमच थेट भरती होत आहे. ९९६ पोलीस पदांसाठी ही भरती केली जाणार आहे. या पदांसाठी सुमारे ७१ हजार अर्ज प्राप्त झाले आहेत. गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी व उमेदवारांवर लक्ष ठेवण्यासाठी जवळपास ५० कॅमेरे लावण्यात आले असून, पोलिसांचे सीसीटीव्ही, भरती प्रक्रिया पार पाडणाऱ्या कंपनीचे कॅमेरे व हँडीकॅमेऱ्याद्वारेही चित्रीकरण करण्यात येणार आहे. यामुळे संपूर्ण प्रक्रियेवर कॅमेऱ्यांची बारीक नजर असणार आहे. ही प्रक्रिया जवळपास दोन महिने सुरू राहणार आहे. संपूर्ण प्रक्रिया जलद व पारदर्शक पद्धतीने पार पडणार असल्याचा दावा पोलिसांकडून करण्यात आला आहे.

भाईंदर पश्चिम येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान या ठिकाणी सोमवार (२ जानेवारी) पासून ही प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. भरती प्रक्रिया पहिल्यांदाच आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने होणार असल्याने येणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला संगणकीय चीप लावण्यात येणार असून, या प्रत्येक उमेदवाराची नोंद संगणकात होणार आहे. सकाळी ५.३० वाजता उमेदवारांची नोंदणी प्रक्रिया सुरू होणार आहे. त्यात प्रत्येक उमेदवाराची बायोमेट्रीक हजेरी घेतली जाणार आहे. त्यानंतर प्रत्येक उमेदवाराला चेस्ट क्रमांक दिला जाईल व त्यात संगणकीय चीप बसविण्यात येणार आहे. सर्वप्रथम उमेदवाराची उंची व छाती मोजली जाणार आहे व



या मोजणीत पात्र ठरणाऱ्या उमेदवारालाच पुढील चाचणीसाठी पाठविण्यात येणार आहे.पुरुष उमेदवाराला १६०० मीटर व १०० मीटर धावणे व गोळाफेक, तसेच महिला उमेदवारांना ८०० मीटर व १०० मीटर धावणे व गोळाफेक या चाचण्यांचा समावेश आहे. हैदराबादच्या 'ई-सॉफ्ट' या कंपनीला हे कंत्राट देण्यात आले आहे. प्राप्त झालेल्या ७१ हजार ९५१ अर्जांमध्ये ५९ हजार ८४७ पुरुष व १२ हजार १०४ महिला उमेदवारांचा समावेश आहे. पहिल्या टप्प्यात केवळ पुरुष उमेदवारांची निवड चाचणी होणार असून, त्यानंतर महिला उमेदवारांची निवड केली जाणार आहे.

भरती प्रक्रियेसाठी कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली असून, अतिरिक्त पोलीस आयुक्तांच्या नेतृत्वाखाली, मुख्यालय उपायुक्त, तीन सहाय्यक आयुक्त, २१ पोलीस निरीक्षक, ३६ सहाय्यक पोलीस निरीक्षक व उपनिरीक्षक आणि २३१ पोलीस कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उमेदवारांसाठी स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी तसेच खाद्यपदार्थांचे स्टॉल आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. भरती प्रक्रिया आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने करण्याच्या सूचना वरिष्ठ पातळीवरून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया जलद, अचूक व पारदर्शक होणार असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीमुळे वेळ आणि श्रम कमी होणार आहेत. भरतीसाठी कोणीही पैशांची मागणी करत असेल तर उमेदवारांनी तातडीने त्याची माहिती पोलिसांना द्यावी - प्रकाश गायकवाड, उपायुक्त, मुख्यालय, मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस.

सकाळ

मिरा-भाईंदर, वसई-विरारमधून ७१ हजार अर्ज; पहिल्यांदाच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

# आयुक्तालयासाठी आजपासून थेट पोलिस भरती प्रक्रिया

भाईंदर, ता. १ (बातमीदार) : मेरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयात शिपाई आणि चालक या पदांसाठी सोमवारपासून (२ जानेवारी) थेट भरती प्रक्रिया सुरू होत आहे. ही प्रक्रिया दोन महिने सुरू राहणार असून या भरतीचे वैशिष्ट्य म्हणजे पहिल्यांदा आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने ही भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया जलद व पारदर्शक पद्धतीने पार पडणार असल्याचा दावा पोलिसांनी केला. तसेच गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी संपूर्ण प्रक्रियेवर कॅमेऱ्याची नजर असणार आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच थेट भरती होत आहे. यात एकंदर ९९६ पोलिस शिपाई आणि १० चालक पदांसाठी ही भरती केली



जाणार आहे. या पदांसाठी सुमारे ७१ हजार अर्ज प्राप्त झाले आहेत. भाईंदर पश्चिम येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान याठिकाणी सोमवारपासून ही प्रक्रिया सुरू होणार असून ती २८ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. ही भरती प्रक्रिया पहिल्यांदाच आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने होणार आहे. यासाठी येणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला संगणकीय चीप लावण्यात येणार असून या प्रत्येक उमेदवाराची नोंद संगणकात होणार आहे. हैदराबादच्या 'ई-सॉफ्ट' या कंपनीला हे कंत्राट देण्यात आले आहे. यात प्राप्त झालेल्या ७१ हजार ९५१ अर्जांमध्ये ५९ हजार ८४७ पुरुष व १२ हजार १०४ महिला उमेदवारांचा समावेश आहे. पहिल्या टप्प्यात केवळ पुरुष उमेदवारांची निवड चाचणी होणार असून त्यानंतर महिला उमेदवारांची निवड केली जाणार आहे. उमेदवारांसाठी स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, तसेच खाद्यपदार्थांचे स्टॉल आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## कडक सुरक्षा व्यवस्था

भरती प्रक्रियेसाठी कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. अतिरिक्त पोलिस आयुक्तांच्या नेतृत्वाखाली, मुख्यालय उपायुक्त, तीन सहाय्यक आयुक्त, २१ पोलिस निरीक्षक, ३६ सहाय्यक पोलिस निरीक्षक व उपनिरीक्षक आणि २३१ पोलिस कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

गेल्या दोन-तीन वर्षांत पोलिस भरती झाली नव्हती. त्यामुळे या भरतीमध्ये मोठ्या संख्येने उमेदवार येणार असल्यामुळे ही प्रक्रिया आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने करण्याच्या सूचना वरिष्ठ पातळीवरून देण्यात आल्या आहेत. तसेच भरतीसाठी कोणीही पैशांची मागणी करत असेल तर उमेदवारांनी तातडीने त्याची माहिती पोलिसांना द्यावी.

- प्रकाश गायकवाड, उपायुक्त, मुख्यालय, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस

## अशी होणार भरती

सकाळी उमेदवारांची नोंदणी प्रक्रिया सुरू होणार आहे. त्यात उमेदवाराची बायोमेट्रीक हजेरी घेतली जाईल. त्यानंतर चेस्ट क्रमांक दिला जाईल, त्यात संगणकीय चीप बसवलेली असणार आहे. सर्वप्रथम उंची व छाती मोजली जाणार आहे. ही मोजणी चीपमधील सेन्सरद्वारे नोंदली जाणार आहे. यात पात्र उमेदवारालाच पुढील चाचणीसाठी पाठवले जाईल. त्यात पुरुष उमेदवाराला १६०० मीटर व १०० मीटर धावणे व गोळाफेक तसेच महिला उमेदवारांना ८०० मीटर व १०० मीटर धावणे व गोळाफेक या चाचण्यांचा समावेश आहे. या चाचण्यांची चीपच्या माध्यमातून संगणकात नोंद केली जाणार आहे.

## कॅमेऱ्यांची नजर

संपूर्ण पोलिस भरती प्रक्रियेवर पन्नास कॅमेऱ्यांची बारीक नजर असणार आहे. यात तीन पद्धतीचे कॅमेरे असणार आहेत. पहिले म्हणजे जागोजागी पोलिसांचे सीसीटीव्ही असणार आहेत. दुसरे म्हणजे भरती प्रक्रिया पार पाडणाऱ्या कंपनीचे कॅमेरे असणार आहेत. याशिवाय जागोजागी हँडीकॅमद्वारेही चित्रीकरण करण्यात येणार आहे.